


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८४ ●बुधवार,दि.१४ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955





# १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकीच बिगुल वाजलं

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदत वाढ सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आज दि.१३ राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली आहे. ५० टक्के आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे तर, ७ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर केले जातील, राज्याचे मुख्य आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. आयोगाच्या या घोषणेनंतर पुणे, सोलापूरसह राज्यातील १२ जिल्हा परिषदांमध्ये आचारसंहिता लागू झाली आहे.

या १२ जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार- लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका ▶उर्वरित पान २ वर

### ● ओबीसी आरक्षणावर २१ जानेवारीला सुनावणी ●

**सुप्रीम कोर्टात येत्या २१ जानेवारी रोजी ओबीसी आरक्षण व बांठिया आयोगाच्या वैधतेच्या मुद्यावर ऐतिहासिक सुनावणी होणार आहे. या सुनावणीत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा व सभापती पदांचे आरक्षण यावर अंतिम निर्णय येण्याची शक्यता आहे. तोपर्यंत होणाऱ्या सर्व निवडणुका व नियुक्त्या न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.**

# ना.अजितदादा पवारांकडून बीडच्या विकासाला अधिकच बळ



## बीडच्या आरटीओ कार्यालयाच्या १२ कोटीच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता, आमदार विजयसिंह पंडित यांची माहिती



**बीड । प्रतिनिधी**

विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून बीडमध्ये विकास कामांना बळ मिळत असून अनेक विकासाचे प्रश्न मार्गी लागत आहेत. गेल्या अनेक दिवसापासून बीडच्या आरटीओ कार्यालयाच्या रखडलेल्या इमारतीचा प्रश्न उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी निकाली काढला आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीडच्या इमारत बांधकामाच्या १२ कोटी ५१ लाख रुपये च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. हा निधी दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री ▶उर्वरित पान २ वर


### ● शासकीय कार्यालयांना मिळतात हक्काच्या इमारती ●

**बीडमध्ये अनेक शासकीय कार्यालयांना स्व मालकीच्या इमारती नसल्याने किरायाच्या इमारतीमध्ये कार्यालय सुरू आहेत. याबाबतचा प्रश्न आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी सातत्याने विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मांडला. यामध्ये सहकार भवनच्या इमारतीचा देखील प्रश्न सुटला असून त्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे, त्याचबरोबर अनेक शासकीय कार्यालयांना हक्काच्या इमारती मिळू लागल्या आहेत. यामध्ये सहकार भवन इमारत, प्रशासकीय कार्यालयाची इमारत, आणि आता आरटीओ कार्यालयाच्या इमारतीचा प्रश्न मार्गी लागलेला आहे.**

# नगराध्यक्ष मुंदडांनी पाळला शब्द; कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करून 'संक्रांत' केली गोड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या मात्र मागील चार महिन्यांपासून वेतनाच्या प्रतीक्षेत असलेल्या कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांना नूतन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी मोठा दिलासा दिला आहे. निवडणुकीनंतर पदभार स्वीकारताना दिलेले आश्वासन पूर्ण करत मुंदडा यांनी संक्रांतीच्या सणापूर्वी कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनापैकी एका महिन्याचा पगार त्यांच्या खात्यात जमा केला आहे. आर्थिक विवंचनेत असलेल्या शेकडो कामगारांची संक्रांत यामुळे गोड झाली असून, शहरात ▶उर्वरित पान २ वर



# गुरुवर्य किसान बाबानी सुरु केलेल्या सप्ताहाचे ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष

## गोरक्षनाथ टेकडी येथे नवनाथ बाबा यांच्या हस्ते विधिवत सप्ताहस आरंभ



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेला धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहची सुरुवात ह भ प गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्ग दर्शना खाली दि १३ जानेवारी मंगळवार रोजी दुपारी १२ वाजता श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे संत, महंत, सामाजिक राजकीय क्षेत्रातील मंडळी तसेच पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत फुले टाकून धर्मनाथा बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आरंभ करण्यात आला. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवर्य किसन बाबा ▶ उर्वरित पान २ वर















# परस्परांतील स्नेह वाढवणारी 'मकर संक्रांत'



असे म्हणतात प्रेमाने जग जिंकता येते. जिथे सर्व शस्त्रांचा प्रभाव संपतो तिथे प्रेमाचे शस्त्र कामी येते. श्रीकृष्णानेही गीतेमध्ये प्रेमाची महती वर्णिली आहे. आपल्या संपूर्ण अवतारकार्यातही भगवंताने प्रेमाचे महत्व आपल्या वर्तणुकीतून प्रसंगांतून दाखवून दिले आहे. भारतीय हिंदू संस्कृतीने तर प्राणिमात्रापासून अगदी निर्जीव वस्तुवरही प्रेम करायला शिकवले आहे. अशा या प्रेमाची शिकवण देणारा वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. तिळगुळाच्या माध्यमातून प्रेमाची देवाणघेवाण करण्यास शिकविणारी मकरसंक्रांत भारतीय संस्कृतीचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो म्हणजेच सूर्याचे उत्तरायण सुरु होते. हा काळ अत्यंत शुभ मानला जातो. शरपंजरी पहुडलेल्या पितामह भीष्मांनीही प्राण त्यागण्यासाठी उत्तरायण सुरु होण्याची वाट पाहिली होती. हिंदू धर्मातील हा एकमेव सण आहे जो शालिवाहन वर्षानुसार साजरा न करता सौर कालगणनेनुसार साजरा केला जातो.. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने या सणाला शेतीविषयक महत्वही आहे. आपल्या शेतात आलेले धान्य या दिवशी सुवासिनी स्त्रिया एकमेकींना वाण म्हणून देतात. याचेच रूपांतर आता हळदी कुंकू समारंभात झाले असून शहरी भागांत स्त्रिया वेगवेगळ्या वस्तू वाण म्हणून देतात. लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांना तिळगुळाच्या लाडूप्रमाणे प्रेमाच्या नात्यात घट्ट बांधण्याची प्रेरणा देणारा हा सण स्नेहाचे आणि प्रेमाचे आगळे महत्व सांगून जातो. एकमेकांना तिळगुळ देताना 'आमचा तिळगुळ सांडू नका, आमच्याशी भांडू नका' असे बजावून वर्षभर परस्परांशी स्नेहाने वागण्याचा जणू करारच या दिवशी केला जातो. आमच्या लहानपणी मोठ्यांना तिळगुळ देऊन त्यांचे शुभाशीर्वाद घेताना पाठीवर पडणारी थाप आम्हा बच्चे कंपनीला वेगळाच आनंद देऊन जाई. तिळगुळ वाटूनही तिळगुळाची वाटी द्रौपदीच्या थालीप्रमाणे भरलेलीच असे. कारण जेव्हढे तिळगुळ दिले जायचे तेव्हढेच पुन्हा वाटीत यायचे. तिळगुळ वाटण्याच्या निमित्ताने जेष्ठ मंडळींकडून होणारे लाड आणि मिळणारे आशीर्वाद आम्हाला ऊर्जा देत असत. तीळ हे स्निग्ध असतात. स्निग्ध म्हणजेच स्नेह. या स्नेहाचे गुळासोबत मिश्रण करून ते घट्ट केले जाते. एकमेकांतील स्नेहाचे नाते असेच घट्ट राहावे यासाठीच मकर संक्रातीच्या दिवशी प्रतीकात्मक तिळगुळ एकमेकांना दिला जातो. तीळ हे उष्ण असल्याने थंडीच्या दिवसांत शरिरातील उष्णता वाढवण्याचे महत्वाचे कार्य करतात त्यासोबत मिश्र केलेला गुळ स्नेहाच्या नात्यातील गोडवा दिवसागणिक वाढत जाण्याची प्रेरणा देतो. मकर संक्रांतीनंतर रथ सप्तमीपर्यंत स्त्रिया घरोघरी किंवा सार्वजनिक ठिकाणी हळदी कुंकू साजरा करतात. एरव्ही एकमेकांशी भांडणाऱ्या, एकमेकांची उणीधुणी काढणाऱ्या स्त्रिया वर्षभरातील सारे हेवेदावे विसरून हळदी कुंकू साजरा करण्यासाठी एकत्र येतात. एकमेकींना हळद कुंकू लावून पस्परांतील शक्तीचे पूजन करतात. प्रेमाचे प्रतीक म्हणून तिळगुळासोबत वाण देतात. मकर संक्रांत हा सण भारताच्या विविध प्रातांसह नेपाळमध्येही उत्साहाने साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी सण साजरा करण्याच्या पद्धती जरी भिन्न असल्या तरी एकमेकांमध्ये प्रेमाची देवाणघेवाण करणे हाच या सणाचा प्रमुख उद्देश आहे. सध्याच्या धावत्या जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालक आपल्या पाल्यांना इंग्रही माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालू लागली आहेत. कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या आजच्या पिढीवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळतो. प्रेम व्यक्त करण्याचे दिवस आणि साधनेही आज बदलली आहेत. परंपरागत सणांची जागा आज निरनिराळ्या 'डेज'ने घेतली आहे. हातभर रिबिनी बांधून आणि अंगावर पेनाने रंगवून, चॉकलेट आणि गुलाबाची फुले वाटून प्रेम दर्शवणारी नवीन पिढी सर्वत्र पाहायला मिळते आहे. ज्या पिढीमध्ये जेष्ठांसाठी केवळ 'मदर्स डे' आणि 'फादर्स डे' तेव्हढे शिल्लक राहिले आहेत. अशा पिढीला मकरसंक्रांतीतील तिळगुळाचा गोडवा कदाचित कळणारही नाही. त्यांच्यावर आपल्या सणांचे आणि संस्कृतीचे महत्व बिंबवणे आज आवश्यक बनले आहे.

– जगन घाणेकर

# माजलगाव संघाचे अजात शत्रु व्यक्तीमत्व;आ.प्रकाश दादा सोळंके

**● माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार, हरितक्रांतीचे प्रणेते आ.प्रकाश दादा सोळंके यांचा आज वाढदिवस आहे.त्यानिमित्त दोन शब्द.**



तब्बल चार दशकांपासून माजलगाव मतदार संघाच्या राजकारणात सक्रिय राहुन, येथील जनतेची अहोरात्र सेवा करणारे एकमेव नेतृत्व म्हणजे आ.प्रकाश दादा सोळंके हे आहेत. या ४० वर्षाच्या कारकीर्दीत मतदार संघात विविध पक्षाचे अनेक नेते आले आणि गेले.मात्र कधी विजय झाला तरी आणि कधी पराभव झाला तरीही माजलगाव मतदार संघ न सोडलेले एकमेव नेते आ.दादाच आहेत. राजकारणात अनेक राजकीय चढ-उतार येतात. त्यात तग धरून संयमाने राहणे खुपच अवश्यक असते. ही कला सर्वांनाच जमते असे नाही.मात्र या कलेत आ.दादा हे तावूनसुलाखून निघाले आहेत. त्यामुळेच ते एक दोन नव्हे तर तब्बल ४० वर्षांपासून याच मतदार संघात कायम टिकून तर आहेतच. शिवाय मतदार संघातील जनतेचे विश्वास पात्र नेतृत्व म्हणुन परिचित आहेत. आ.दादांचा राजकीय प्रवास जि.प.सदस्य, पंचायत समिती सभापती, आमदार, राज्यमंत्री असा आहे.हे सर्व राजकीय पदे भुषवत असताना त्यांनी कधीही गर्व केला नाही.की कधी जनतेशी उद्धटपणाचे वर्तन केले नाही.कायम संयमाची भुमिका घेत लोकांचे प्रश्न जाणून घेत आपले कार्य चालुच ठेवले.आ.दादा हे आमदार होण्यापूर्वी मतदार संघ विकासापासुन कोसो दुर होता.मतदार संघात ना दळणवळणाची सोय होती ना सिंचनाची सोय होती.अगदीच सांगायचे झाले तर मतदार संघातील जनतेला विकास काय असतो हेच माहिती नव्हते.मात्र दादा आमदार झाले आणि पहिल्या पाच वर्षांत मतदार संघातील गावागावात एक एक विकास कामे होऊ लागले.आ.दादांनी मतदार संघात प्रथम दळणवळण व सिंचनाची कामे प्राधान्याने मार्गी लावत मतदार संघात अनेक गावात सिंचनाची विविध कामे करून जमिनी ओलिताखाली आणल्या.तसेच गावोगावचे रस्ते राज्य व राष्ट्रीय महामार्गास जोडल्याने दळणवळण सोयीस्कर झाले. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या.हाताला काम मिळु लागले.तसेच लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी मुहूर्तमेढ रोवलेल्या लोकनेते सोळंके साखर कारखान्याच्या माध्यमातुन ऊसउत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक प्रगती आणत त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ऊसाला रास्त भाव दिला.याशिवाय आ.दादांचा समाजातील चौफेर प्रश्नांचा गाढ अभ्यास असल्याने ते प्रत्येक गावात कुठल्या विकास योजना हवी हे अचूक हेरून, त्या गावात तीच विकास योजना देतात. त्यामुळे तेथील लोकांचा त्यांच्या प्रति विश्वास वाढतच असतो.आ.दादांनी विकास कामात कधीही राजकारणाचा आडपडदा येऊ दिला नाही.विरोधकांच्या गावात ही ते मोठ्या प्रमाणात विकास निधी देतात. त्यामुळे विरोधकांकढे दादांच्या विरोधात कुठलाच ठोस मुद्दा कधीच नसतो. तसेच शेतकरी, कष्टकरी, शेतमजुर, मजुर या सर्वांच्या बाबतीत ही ते नेहमीच सकारात्मक प्रतिसाद देत असतात. तसेच मतदार संघात शिक्षणाचे विस्तारीकरण करण्यासाठी ही कायमच प्रयत्नशील असतात. आ.दादा हे मतदार संघातील एकमेव जनतेचे विश्वास पात्र नेतृत्व ठरले.त्यामुळेच ते तब्बल पाच वेळा मतदार संघाचे आमदार म्हणुन विजयी होतात. आज परिस्थितीत राज्य विधिमंडळातील ते सर्वात जेष्ठ आमदार आहेत. आपल्या आमदारकीच्या वीस वर्षाच्या व चालु पंचवार्षिकमध्ये दीड वर्षे असे जवळपास बावीस वर्षाच्याच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी विकासाचा अनुशेष भरून काढत, मतदार संघ विकास प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले.या सर्व राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रवासात त्यांना लहान भाऊ धैर्यशील काका सोळंके यांची कायमच साथ असते.काका हे लक्ष्मणाप्रमाणे मोठे रामा समान बंधु आ.दादा यांच्यासोबत राहुन त्यांना साथ देतात. शिवाय मुलगा चेअरमन विरेंद्र दादा व पुतन्या जयसिंह भैया यांचीही त्यांना कायमच साथ असते.विकासाची चौफेर दुरदृष्टी असलेल्या व विकासाची जाण असलेल्या आ.प्रकाश दादा सोळंके यांना वाढदिवसानिमित्त मन:पुर्वक खुप खुप हार्दिक शुभेच्छा.मतदार संघातील जनतेची सेवा करून, विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना...

**– सुरेश लगड, सचिव**
**लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखाना, लि.सुंदर नगर.**

# जनतेच्या विश्वासावर उभे राहिलेले नेतृत्व : आ. प्रकाश दादा सोळंके

● माजलगाव मतदारसंघाचे प्रतिनिधित्व मागील अनेक वर्षांपासून सातत्याने करणारे, लोकाभिमुख आणि विकासकेंद्री नेतृत्व म्हणून ओळख असलेले आ. प्रकाश दादा सोळंके यांचा वाढदिवस आज विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होत आहे. सर्वसामान्य जनतेशी थेट संवाद, सातत्यपूर्ण कामकाज आणि विकासाची स्पष्ट दिशा ही त्यांच्या कार्याची ओळख राहिली आहे.

लोकनेते स्व. सुंदरराव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आ. प्रकाश दादा सोळंके यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. पंचायत समिती स्तरापासून सुरू झालेला हा प्रवास राज्याचे महसूल मंत्रीपदापर्यंत पोहोचला. या कालावधीत त्यांनी जबाबदारीची विविध पदे सांभाळताना सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून काम केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव तालुक्यातील अनेक सर्वसामान्य कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, बाजार समिती संचालक, सभापती तसेच विविध निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. सामाजिक व राजकीय सलोखा जपत संघटन मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला.

साधेपणा, स्पष्ट विचारसरणी आणि लोकांप्रती असलेली बांधिलकी ही आ. प्रकाश दादा सोळंके यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये मानली जातात. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी ते कार्यरत असतात.

विकासकामांमध्ये शिक्षण क्षेत्राला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. ग्रामीण भागातील शाळा खोल्या, भौतिक सुविधा व शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. त्याचबरोबर मतदारसंघातील विविध ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू करून ग्रामीण आरोग्यसेवा सक्षम करण्यात आली.

कृषीप्रधान माजलगाव तालुक्यात शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी दूरगामी धोरण स्वीकारण्यात आले. कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर झाल्यासच शेतकऱ्यांचा खरा विकास होईल, या भूमिकेतून माजलगाव सहकारी साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना योग्य दर, युवकांना रोजगाराच्या संधी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने जागृती पतसंस्थेची स्थापना करून बचत गट चळवळीला प्रोत्साहन देण्यात आले. महिलांना आर्थिक स्वावलंबन व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य यामधून साध्य झाले.

मतदारसंघात पाणीपुरवठा, वीज, रस्ते व सिंचन या मूलभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला. जलस्वराज्य योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना, गाव ते शिवार रस्ते तसेच सिंदफणा व गोदावरी नद्यांवर बंधारे उभारून शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्यात आली.

शिक्षण क्षेत्रात कानिफनाथ विद्यालय, सिंदफणा पब्लिक स्कूलसारख्या संस्थांमधून दर्जेदार व इंग्रजी माध्यमाचे शिक्षण उपलब्ध झाले. या संस्थांमधील विद्यार्थी आज डॉक्टर, अभियंता, वकील, आयएएस, आयपीएस अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. मुलींसाठी शिक्षक प्रशिक्षण, नर्सिंग व आरोग्यविषयक अभ्यासक्रमांची सोय करून शैक्षणिक संधींचा विस्तार करण्यात आला.

या सर्व कार्यामुळे आ. प्रकाश दादा सोळंके हे माजलगाव तालुक्यातील विश्वासार्ह, सुसंस्कृत आणि विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात. वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनतेच्या सेवेसाठी अधिक बळ लाभो, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

– पुरुषोत्तम सोळंके, क्रीडा शिक्षक
सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव

◆ पान ४ वरून पुढे...

## तहसीलदार शेळकेंच्या...

ग्रामपंचायत यंत्रणा एकत्र आल्या . नेकनूर पोलिस स्टेशनचे बीट अमलदार सचिन मुरुमकर यांच्या पथकाच्या उपस्थितीत अतिक्रमण हटवण्यात आले . ग्राम महसूल अधिकारी शिवराम येवले , मंडळ अधिकारी दिनकर जायभाय , महसूल सेवक बाबासाहेब बिरलींगे आणि ललित काकडे यांनी सलग ठाण मांडून रस्ता मोकळा केला . विशेषतः उसाची वाहतूक आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी हा रस्ता खुला झाल्याने महिला शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले . ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनीही गावकऱ्यांमध्ये समन्वय साधत प्रशासनाला सहकार्य केले .या संपूर्ण प्रकरणात सरपंच अनिल शेंडगे यांनी गावकऱ्यांची बाजू सांभाळत प्रशासनाला मोलाचे सहकार्य केले . अखेर महसूल प्रशासन , पोलीस यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांच्या एकत्र प्रयत्नातून चार वर्षांपासून अडलेला प्रश्न एका दिवसात सुटला तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , सार्वजनिक रस्ते , शासकीय जमिनी किंवा वहिवाटीचे मार्ग अडवणाऱ्यांना अजिबात माफ केले जाणार नाही . अशा प्रकारांची माहिती दिल्यास तात्काळ कारवाई केली जाईल . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि प्रशासनाला साथ द्यावी , असे आवाहन केले आहे .

विशेष म्हणजे गेवराई, गंगापूर , पैठण , घनसावंगी आणि अंबड येथे तहसीलदार म्हणून काम करत असतानाही चंद्रकांत शेळके यांनी रस्त्यांची कामे प्राधान्याने केली होती . बीडमध्ये आल्यानंतरही त्यांनी हीच वाट धरली आहे . मागील एका वर्षात त्यांनी जवळपास शंभर किलोमीटर रस्ते अतिक्रमणमुक्त करून जनतेसाठी खुले केले आहेत . त्यामुळे गावोगाव त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त होत असून , सामान्य माणसातून त्यांचे आभार मानले जात आहेत .

◆ पान ४ वरून पुढे...

## निवडणुका कधीही...

सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतो. जनसेवेतुन माझं राजकारण आहे. निवडणुकीची मला चिंता नाही, कारण माझं बळ हे जनतेचं प्रेम आणि विश्वास आहे, असं मस्के यांनी सांगितलं. राज्यातील बारा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी बीड जिल्ह्याची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. मस्के यांनी सांगितलं की, निवडणुका आज झाल्या किंवा पुढे कधी ही झाल्या, तरी मी जनसेवेसाठी ३६५ दिवस तत्पर असतो. माझं कार्यच माझा प्रचार आहे. काही लोक निवडणुका जवळ आल्या की पावसाळी छत्र्याप्रमाणे उगवतात आणि मतदारांना प्रलोभन दाखवतात. पण सजग मतदार अशा लोकांवर विश्वास ठेवत नाहीत. जनतेला माझा सेवाभाव आणि विकासाची कृतिशीलता अनुभवायला मिळाली आहे, त्यामुळे विजय माझाच होणार हे निश्चित आहे. करचुंडी येथील शिंदे वस्ती, मोरगाव जाधव वस्ती रस्ता, मुळूकवाडी ते तवले वस्ती पांदण रस्ता अशा वाड्या वस्त्यांना रस्त्याची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे लिंबागणेश जिल्हा परिषद गटात केलेल्या विविध विकासकामांमुळे आणि लोकांशी सातत्याने जोडलेल्या संवादामुळे राजेंद्र मस्के यांच्यावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचं चित्र या भेटीतून स्पष्ट दिसून आलं

◆ पान ४ वरून पुढे...

## चाकरवाडी जिल्हा....

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका श्रीमती गायकवाड मॅडम, उपक्रमशील शिक्षिका श्रीमती सुचिता हिंदुळे मॅडम, आदरणीय श्रीमती अनिता गायकवाड मॅडम, आदरणीय श्रीमती धाडवे मॅडम तसेच सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आधुनिक आंबेडकरी....

पालकांनी उपस्थिती लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेसाठी भोजनदान व चहा-पाण्याची व्यवस्था नवनिर्वाचित नगरसेवक सय्यद रफीक अली यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धम्मचारी अमोलरत्न यांनी केले, तर आभारप्रदर्शन धम्ममित्र दीपककुमार भालेराव यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी धम्मचारी मंजुरक्षित, धम्ममित्र नवनाथ शिनगारे, लक्ष्मण सहजराव, भीमराव ढाकरगे, लक्ष्मण पोटभरे, जी. एन. घनघाव, विनय पोटभरे, शुभम फंदे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## लग्नाला सहा वर्षे...

कारणावरून तिचा पती उद्धव ठोंबरे हा दारूच्या नशेत तिला सतत शिवीगाळ आणि मारहाण करत असे. केवळ पतीच नाही, तर सासू इंदूबाई आणि सासरे उत्तम ठोंबरे हेही 'आम्हाला वंशाचा दिवा मुलगाच पाहिजे,' असा हट्टाहास धरून तिचा छळ करत होते. या सततच्या जाचाला आणि टोमण्यांनी अरुणा पूर्णपणे खचून गेली होती. तर पतीकडून दारू पिऊन शारीरिक त्रास दिला जाऊ लागला , मानसिक त्रास हा वाढत गेला अरुणाला हा होत असलेला सततचा त्रास सहन होत नव्हता, उठता बसता मानसिक ताण यामुळे अरुणाला आपल्या तीन चमुड्या आपल्या नंतर कशा राहतील याचा देखील विचार न करता अखेर जे नको तेच झाले. नेहमी प्रमाणे अरुणा घरी होती. घरातील सर्व जण कामात असताना पाहून अरुणाने उंदरी येथील राहत्या घरातील फॅनला साडीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना समोर आली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली तर सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. जिच्या जीवावर या तीन चिमुकल्या लहानाचा मोठ्या होणार होत्या तो आधार आता कायमचा तुटला ऐन उमेदीच्या काळात एका मातेने अशा प्रकारे आपली जीवनयात्रा संपविल्याने तिच्या तिन्ही मुली पोरक्या झाल्या आहेत. तिच्या माहेरच्या लोकांवर दुःखाचा डोंगर कोसलळा. या प्रकरणी मयत अरुणाचा भाऊ गोविंद सूर्यवंशी यांनी केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलिस ठाण्यात सासरच्या लोकां विरोधात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पती उद्धव ठोंबरे, सासू इंदूबाई आणि सासरे उत्तम ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि भारत बर्डे या प्रकरणाचा अधिक तपास करत असल्याचे सांगण्यात आले आहे.

## बीडला महसूल ...

कर्मचाऱ्यांना १२ जानेवारी रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर हजर राहून कार्यवाही करीत अहवाल तहसील कार्यालयाला पाठविण्याचे आदेश दिले होते, परंतु मंडळ अधिकाऱ्यांनी मोजणी करताना सहकार्य केले नसल्याने लांडगे कुटुंबातील चार जणांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

◆ पान ९ वरून पुढे...

## १२ जिल्हा परिषद...

पार पडणार आहेत. या निवडणुकांसाठी मतदारांना दोनदा मतदान करावे लागणार असून, यासाठी १ जुलै २०२५ ची यादी वापरली जाणार असून, – नॉमिनेशन ऑफलाईन पद्धतीने दाखल करता येणार आहे. ३ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी जाहीर झाली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख – १६ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६

उमेदवारी अर्ज छाननी तारीख – २२ जानेवारी २०२६

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख – २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३ वाजेपर्यंत)

निवडणुकीसाठी अंतिम उमेदवार यादी व चिन्ह वाटप तारीख – २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३.३० नंतर)

जिल्हापरिषद निवडणूक मतदान तारीख – ५ फेब्रुवारी २०२६ (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३०)

जिल्हापरिषद निवडणूक मतमोजणी तारीख – ७ फेब्रुवारी २०२६ (सकाळी १० वाजेपासून)

प्रचार कालावधी– मतदानाच्या २४ तास पूर्वी प्रचाराची वेळ समाप्त होणार पत्रकार परिषद संपताच जिल्हापरिषद निवडणुकीसाठी आचारसंहिता सुरू

१५ फेब्रुवारीपर्यंत निवडणुका घेण्याचे SC चे निर्देश– सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला मोठा दिलासा देत काल (दि.१२) झेडपी निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली होती. त्यानुसार आता झेडपीच्या निवडणुका १५ फेब्रुवारीपर्यंत घेता येणार आहेत. यापूर्वी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र, आता कोर्टाने झेडपी निवडणुका घेण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने एक अर्ज दाखल करण्यात आला होता. ज्यात ज्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे वाढवली गेलेली नाही. त्या निवडणुकांसाठी दहा दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. आयोगाची ही मागणी मान्य करण्यात आता १० दिवसांऐवजी १५ दिवसांची मुदत वाढवून देण्यात आली आहे.

## ना.अजितदादा....

अजित दादा पवार यांचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आभार मानले आहेत. विविध विकास कामांच्या उद्घाटनाच्या निमित्ताने विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार बीडमध्ये येत असताना आमदार विजयसिंह पंडित यांनी बीड येथील नाट्यगृहाच्या कामासंदर्भात आठवण करून दिली. त्यावर ना.अजित दादानी पुण्यावरून येत असताना पुणे विमानतळावर नाट्यगृहाच्या कामासंदर्भातली फाईल बोलून घेत त्यावर स्वाक्षरी करून बीड मधील नाट्य प्रेमींच्या आग्रहाची मागणी असलेला नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचा प्रश्न मार्गी लावला. त्यासाठी ८ कोटी रुपये एवढा निधी दिला.त्यानंतर आमदार विजयसिंह पंडित यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीडच्या इमारतीचा प्रश्न दादांच्या कानी टाकला होता, याबाबत सातत्याने प्रशासनाशी देखील आमदार विजयसिंह पंडित यांचा पाठपुरावा सुरू होता. त्यावर तसा प्रस्ताव परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाकडे सादर केला होता. त्यास दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी गृह परिवहन विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून १२ कोटी ५१लक्ष ६००० रुपये इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय वित्ती मान्यता देण्यात आली आहे. बीडच्या आरटीओ कार्यालयाच्या इमारतीसाठी नामदार अजित दादा पवार यांच्याकडून १२ कोटी पेक्षा अधिकचा निधी दिल्याबद्दल विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आभार मानले आहेत.

## गुरुवर्य किसान....

महाराज यांचे प्रतिमापूजन तसेच दीप प्रज्वलन गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. कलश पूजन वाद्यपूजन विना पूजन, ग्रंथ पूजन, गाथा पूजन, ज्ञानेश्वरी पूजन,संत महंतांच्या हस्ते करण्यात आले यावेळी पंचक्रोशीतील टाळकरी माळकरी विणेकरी मृदंग वादक गायनाचार्य मृदुंगाचार्य व भाविक भक्त उपस्थित होते. गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील निवासस्थानाचे आज उद्घाटन करण्यात आले

आज पासून सुरू झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये हरी किर्तन, प्रवचन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन ,हरिपाठ, भावार्थरामायण, विष्णुसहस्रनाम हरिजागर, काकडा भजन भारुड अभंग वाणी अशा पद्धतीचे भक्तीमय कार्यक्रमाच्या आयोजन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये करण्यात आलेले आहे तरी या कार्यक्रमात करिता भावी भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान गुरुवर्य महंत शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या वतीने करण्यात आले आहे

चौकट:– धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये भाविक भक्ताना २४ तास भोजनाची व्यवस्था करण्यात आलेले आहे

## नगराध्यक्ष मुंदडांनी....

नगराध्यक्षांच्या या संवेदनशील निर्णयाचे स्वागत होत आहे.

नगर परिषदेच्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन गेल्या अनेक महिन्यांपासून रखडल्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती. सणासुदीच्या काळात हक्काचे पैसे मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये मोठी अस्वस्थता होती. ही बाब लक्षात घेऊन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी पदभार स्वीकारताच या प्रश्नाला प्राधान्य दिले. त्यांनी प्रशासनाला थकीत कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबवण्याचे कडक निर्देश दिले होते. या मोहिमेला यश आले असून, जमा झालेल्या निधीचा पहिला विनियोग कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यामुळे कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा झाली आहे.

नगर परिषदेची आर्थिक स्थिती सध्या नाजूक असली तरी, मार्च अखेरपर्यंत संपूर्ण आर्थिक घडी पुन्हा बसवण्याचा निर्धार मुंदडा यांनी व्यक्त केला आहे. येणाऱ्या काळात जशी कर वसुली होईल, त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांचे उर्वरित थकीत वेतनही प्राधान्याने दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. केवळ स्वच्छता कर्मचारीच नव्हे, तर थकीत वीज बिले आणि इतर प्रलंबित देयके मार्गी लावण्यासाठी प्रशासन नियोजनबद्ध प्रयत्न करत आहे. शहराच्या विकासकामांना गती देण्यासाठी आणि कष्टकरी कर्मचाऱ्यांचे हक्क वेळेवर मिळण्यासाठी शहरातील नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता व पाणी कर भरून पालिकेला सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहनही नगराध्यक्षांनी यावेळी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांना लोकरत्न पुरस्कार देऊन केले सन्मानित



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉनसन साहेब यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला यामध्ये प्रशासकीय अधिकारी सामाजिक कार्य करणारे व्यक्ती यांना सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष असे लाभलेले जिल्हाधिकारी विवेक जॉनसन साहेब यांना आज लोकशाही पत्रकार संघ सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनच्या वतीने लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यामुळे येथे उपस्थित असलेले पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ शिरोळे पाटील यांच्या हस्ते हा लोक रत्न पुरस्कार कलेक्टर साहेबांना देण्यात आला यावेळी येथे उपस्थित लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश सहसचिव सुनील दादा महा कुंडे तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह आदी सह उपस्थित होते बीड जिल्ह्यामध्ये बीड जिल्हा अधिकारी म्हणून चार्ज घेतल्यापासून शासनाच्या धोरणाच्या कामाची म्हणजेच महाराष्ट्रा राज्याचे मा मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा भाऊ व मा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब तसेच महाराष्ट्र राज्याचे मा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार मा श्री अजित दादा पवार साहेब यांच्या मंत्रिमंडळाने बीड जिल्ह्याच्या विकासाच्या धोरणात्मक निर्णय या बाबतीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये एक स्पर्ट आणि यशस्वी ठरलेले जिल्हाधिकारी मा विवेक जॉनसन साहेब हे आहेत.

# भगवानराव शिनगिरे यांचा लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्काराने सन्मान

## आदर्श सरपंच व समाजकार्याचा दीपस्तंभ –सुरेश यादव

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील वटणवाडी येथील मा.भगवानराव शिनगिरे यांचा लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मान प्रदान करताना सुरेशजी यादव यांनी गौरविले.भगवानराव (दादा) शिनगिरे हे केवळ एक यशस्वी सरपंच नाहीत, तर ग्रामीण विकासाच्या संकल्पनेला कृतीत उतरवणार नेतृत्व आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभे राहिलेले आदर्श गाव हे संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणास्थान ठरले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन हे गाव दूरदर्शन वाहिनीवर प्रथमच प्रसारित झाले–ही बाब त्यांच्या नियोजनबद्ध, लोकाभिमुख व सर्वसमावेशक विकासदृष्टीची साक्ष देते. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ ते सातत्याने समाजातील वंचित घटकांसाठी कार्यरत आहेत. विशेषतः अनुसूचित जाती, ऊसतोड कामगार कुटुंबे व शाळाबाह्य विद्यार्थी यांच्यासाठी त्यांनी मोफत शिक्षण–सुविधा,



निवास, मार्गदर्शन व मूलभूत सोयी उपलब्ध करून दिल्या. या कार्यात त्यांनी कधीही थांबा घेतला नाही–कारण त्यांची प्रेरणा पद किंवा प्रसिद्धी नव्हे, तर सामाजिक न्याय आणि मानवी सन्मान आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, शासनाकडून कोणतेही अनुदान–एकही रुपया–न घेता त्यांनी सुंदर, शिस्तबद्ध व प्रभावी प्रकल्प उभा केला, तो यशस्वीपणे चालवला आणि आजही चालवत आहेत. ही बाब त्यांच्या स्वावलंबन, पारदर्शकता व व्यवस्थापन कौशल्याची प्रचिती देते. सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणूनही भगवानराव शिनगिरे ओळखले जातात. सहकारातील तत्त्वे–लोकसहभाग, सामूहिक निर्णय व दीर्घकालीन शाश्वतता–यांचा त्यांनी गावविकासात प्रभावी वापर केला.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १३/०१/२०२६

**टी सी हरवला आहे.**

**विक्रांत विनोद इंगोले** या नावाचा इयत्ता १० वी चा टीसी (TC) बीड ते ढेकणमोह प्रवास करत असताना बीड बस स्थानकावर टीसी हरवला आहे. जर कोणाला सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा – ९५४५०२९८९८

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब (क. स्तर)**
**शिरुर कासार, यांचे न्यायालयात**
**कि. दि. अर्ज क्रमांक–९ / २०२६**

अर्जदार :–१) **साकर भ्र. अनाजी टाचतोडे वय ७४ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड. २) निवृत्ती पि. अनाजी टाचतोडे वय ५४ वर्षे, धंदा– शेती, रा. सदर. मो.नं. ९७६४९५२१११९. ३) सुमन भ्र. श्रीरंग माने वय ५६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. भातकुडगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर. ४) विमल भ्र. सर्जेराव चव्हाण वय ५५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. रायमोहा, ता. शिरुर कासार, जि. बीड. ५) पुष्पा भ्र. राजेंद्र गुजर वय ५० वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. चिपाडे मळा, सारसनगर, ता. जि. अहिल्यानगर.**

विरुध्द

गैरअर्जदार– नील

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्यापेक्षा मयत नामे **अनाजी पि. बाळाजी टाचतोडे,** रा. राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड हे दिनांक२९/०७/२०२५ रोजी राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड येथे रहात्या घरी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नि असुन, अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ ते ५ ह्या मयताच्या विवाहीत मुली आहेत. असे त्यांनी अर्जात नमुद केले आहे व अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने मा. कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदती कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सरदहु को अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु अपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक–१२/१/२०२४ रोजी माझे सहीने व नयायालयाच्या शिक्यानिशी दिले **सदर प्रकरणात पुढील तारीख २१ /२/२०२४ हि आहे. आदेशावरून**

(ॲड. एच. एस. कोठुळे) (स्वाक्षरीत)

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक — सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर का.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर,**
**बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९७७/२०२५**
**अप्पासाहेब वि. निरंक**

ज्यापेक्षा केशरबाई भ्र. भगवान काळे, हया दिनांक ३०/१२/२०२० रोजी मौजे नेकनूर, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

**१. अप्पासाहेब पि. भगवान काळे, वय. ६२ वर्षे, धंदा. शेती, रा. नेकनुर, ता.जि.बीड, ह.मु. पिंपळगाव महाळुंगे, ता. अंबेगाव, जि. पुणे**

अर्जदार हा मयताचा मुलगा आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे, वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे

केशरबाई भ्र. भगवान काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **आदेशावरून**

**ॲड. रोटे डी.एम. यांचे मार्फत** **(स्वाक्षरीत)**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक** — **अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश**
**व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १८०६/२०२५**
**सत्यभामा डुचे वि. निरंक**

ज्यापेक्षा लक्ष्मण दाजीबा डुचे, हे दिनांक ०६/११/२०२५ रोजी मौजे मानेवाडी, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

**१. सत्यभामा भ्र. लक्ष्मण डुचे, वय. ७७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. मानेवाडी, ता. जि. बीड. २. श्रीराम पि. लक्ष्मण डुचे, वय. ५४ वर्षे, धंदा. शेती, रा. सदर**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे लक्ष्मण दाजीबा डुचे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख १९/०१/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **आदेशावरून**

**ॲड. रोटे डी.एम. यांचे मार्फत** **(स्वाक्षरीत)**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक** — **अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर,**
**बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७९२/२०२५**
**जालींदर भड वि. निरंक**

ज्यापेक्षा पुतळाबाई भ्र. जालिंदर भड, हे दिनांक ०८/०९/२०२५ रोजी मोरगाव, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

**१. जालिंदर पि. विनायक भड, वय. ७० वर्षे, धंदा. शेती, रा. मोरगाव, ता.जि.बीड. ह.मु. आनंद हॉस्पीटल जवळ, शितल निवास, तापकीर नगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे. २. शीतल भ्र. दशरथ कोटुळे, वय. ३७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. आनंद हॉस्पीटल जवळ, शितल निवास, तापकीर नगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे**

अर्जदार क्र. १ हे मयताचे पती आहेत. अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे पुतळाबाई भ्र. जालिंदर भड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १९/०१/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **आदेशावरून**

**ॲड. रोटे डी.एम. यांचे मार्फत** **(स्वाक्षरीत)**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक** — **अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज १८७८/२०२५**
**अब्दुल्ला विरुध्द निरंक**

अर्जदार :– (१) **अब्दुल्ला असगर हुसेन शेख वय ६९ वर्षे, धंदा–व्यापार रा.नेकनुर ता.जि.बीड ह–मु. कामराज नगर, युसुफ शाह दर्गा,येरवडा, पुणे ता.जि.पुणे. २) फारूक आहेमद अजगर हुसेन शेख, वय ७३, धंदा व्यापार, रा. नेकनुर ता. जि. बीड ह–मु. कामराज नगर, युसुफ शाह दर्गा, येरवडा, पुणे ता.जि.पुणे. (३) नुरजहा बेगम फारूकी, वय ७९, धंदा घरकाम, रा. पंचायत समिती जवळा, गणेश कॉलनी, औरंगाबाद (४) शेख हलीमाबी शेख अजगर हुसेन, वय८ ३, धंदा घरकामा, रा. शहेबाज कॉलनी, नेकनुर ता. जि. बीड (५) रफत सुलताना महेमुद शेख, वय७४, धंदा घरकाम, रा.श्रीकृष्ण नगर, बोरीवली पूर्व मुंबई**

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रशीदाबी शेख असगर हुसैन, रा. नेकनुर ता. जि.बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **रशीदाबी शेख असगर हुसैन,** रा. नेकनुर ता. जि.बीड यांचा मृत्यु दि. २८/०८/२०११ रोजी नेकनुर ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार १ व २ हे मयताचे मुले असुन क. ३ ते५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु रशीदाबी शेख असगर हुसैन, रा. नेकनुर ता. जि.बीडयांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१ माहे जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २० जानेवारी २०२६ आदेशावरून**

**(ॲड. डी. एम. रोटे)** **(स्वाक्षरीत)**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक** — **अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.९८२/२०२५**
**मधुकर बापुराव बांगर विरुध्द ग्रा.पं.कार्या. खंडाळा**
**पहा, १. मधुकर बापुराव बांगर, रा. खंडाळा, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **मनोज मधुकर बांगर यांचा दिनांक २५/०६/१९९५ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८५६/२०२५**
**अजमोद्दीन नवाज शेख विरुध्द ग्रा.पं.कार्या.कारळवाडी/निर्मळवाडी**
**पहा, १. अजमोद्दीन नवाज शेख, रा. निर्मळवाडी, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **अजमोद्दीन नवाज शेख यांचा दिनांक ११/०५/१९६८ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **कारळवाडी/निर्मळवाडी** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **कारळवाडी/निर्मळवाडी** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ७८२/२०२५**
**खाजा सिकंदर पठाण विरुध्द ग्रा.पं.कार्या.काळेगाव (हवेली)**
**पहा,**
**१. खाजा सिकंदर पठाण, रा. काळेगाव (हवेली), ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **खाजा सिकंदर पठाण यांचा दिनांक ०६/०२/१९७३ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **काळेगाव (हवेली)** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **काळेगाव (हवेली)** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ७८१/२०२५**
**खाजा सिकंदर पठाण विरुध्द ग्रा.पं.कार्या.काळेगाव (हवेली)**
**पहा,**
**१. खाजा सिकंदर पठाण, रा. काळेगाव (हवेली), ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **नजीराबी सिकंदर पठाण यांचा दिनांक ०५/०९/१९७१ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **काळेगाव (हवेली)** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **काळेगाव (हवेली)** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ६८२/२०२५**
**मंदा उत्तम पवार विरुध्द ग्रा.पं.कार्या. खंडाळा**
**पहा, १. मंदा उत्तम पवार, रा. खंडाळा, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **प्रज्ञा मंदा पवार यांचा दिनांक ०९/०६/२००९ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ६८३/२०२५**
**गंगासागर बाबासाहेब तांदळे विरुध्द ग्रा.पं.कार्या.हिंगणी (खु.)**
**पहा, १. गंगासागर बाबासाहेब तांदळे , रा.हिंगणी (खु.), ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **गंगासागर बाबासाहेब तांदळे यांचा दिनांक ०७/०६/१९८४ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **हिंगणी (खु.)** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **हिंगणी (खु.)** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ६८४/२०२५**
**गाहिनीनाथ रघुनाथ आंधळे विरुध्द ग्रा.पं.कार्या.हिंगणी (खु.)**
**पहा, १. गाहिनीनाथ रघुनाथ आंधळे , रा.हिंगणी (खु.), ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **समाधान गहिनीनाथ आंधळे यांचा दिनांक १५/१०/२०१७ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **हिंगणी (खु.)** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **हिंगणी (खु.)** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ६८५/२०२५**
**गाहिनीनाथ रघुनाथ आंधळे विरुध्द ग्रा.पं.कार्या.हिंगणी (खु.)**
**पहा, १. गाहिनीनाथ रघुनाथ आंधळे , रा.हिंगणी (खु.), ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **तनुजा गहिनीनाथ आंधळे यांचा दिनांक ०१/०८/२०१२ रोजी** जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **हिंगणी (खु.)** ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **हिंगणी (खु.)** ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०२/२०२६ ही आहे.**

शिक्का **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ ● पान ४

# बीडच्या आरटीओ ऑफिससाठी १२ कोटींचा निधी

### आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अर्थात आरटीओ ऑफिसच्या बांधकामांसाठी तब्बल १२ कोटी रूपयांचा भरघोस निधी मंजूर झाला आहे. यातून आ.संदीप क्षीरसागर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बीडच्या आरटीओ ऑफिसला स्वतःच्या मालकीची इमारत नव्हती. बीड शहरातील विविध ठिकाणी किरायाच्या जागेत सदरील महत्वाचे कार्यालय चालत होते. त्यामुळे नागरिक, अधिकारी व वाहनधारक यांना सोयीसुविधांच्या अभावामुळे अडचणींना सामोरे जावे लागत होते. बीडच्या आरटीओ ऑफिसचा प्रश्न प्रलंबित होता. ही बाब लक्षात घेऊन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी आरटीओ ऑफिससाठी एक सुसज्ज इमारत असावी याकरिता शासनदरबारी पाठपुरावा केला होता. त्यावर आता शासनाकडून या कामासाठी तब्बल १२ कोटी रूपयांचा भरघोस निधी प्रशासकीय मान्यतेसह मंजूर करण्यात आला आहे. यामुळे बीडच्या आरटीओ ऑफीससाठी एक सुसज्ज आणि सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण इमारत मिळणार आहे. या कामास मंजुरी दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

# बीडीओंसह इतरांसाठी लाच घेणारा सरपंच पकडला...

# धाराशिव एसीबीची बीडमध्ये कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

नरेगाअंतर्गत विहिर मंजूर करून त्यावर बीडीओंसह इतरांच्या सह्या घेण्यासाठी लाचेची मागणी करण्यात आली. केज तालुक्यातील तरनळी ग्रामपंचायतीचे सरपंच महादेव प्रताप खेडकर (वय ३५, रा.तरनळी ता.केज, जि. बीड) यांना ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. ही कारवाई मंगळवारी (दि.१३) सायंकाळी करण्यात आली.



तक्रारदाराने २३ डिसेंबर २०२५ रोजी तक्रार दिली होती. कार्यारंभ तक्रारदार व अन्य तिघांच्या शेतजमिनीत एमआरईजीएस योजनेंतर्गत जलसिंचन विहीर मंजूर करून देण्यासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये, असा एकूण १ लाख रुपयांचा खर्च मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीच्या अनुषंगाने २३ व २४ डिसेंबर २०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यात सरपंच खेडकर यांनी विहिरीच्या प्रस्तावावर सही करून बीडीओ व इतर अधिकार्यांकडून मंजुरी मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडून १० हजार व उर्वरित तिघांकडून प्रत्येकी २० हजार रुपये, असा एकूण ७० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. १ जानेवारी २०२६ रोजी पहिली सापळा कारवाई करण्यात आली असता आरोपीने थेट रक्कम स्वीकारली नाही. त्यानंतर १३ जानेवारी २०२६ रोजी केज पंचायत समितीच्या पाठीमागील खेडकर यांच्या रूममध्ये सापळा कारवाई करण्यात आली. कार्यारंभ यावेळी तक्रारदाराकडून पंचासमक्ष ७० हजार रुपये स्वीकारताना त्यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी सरकारतर्फे फिर्याद पोलिस निरीक्षक विजय हनुमंत वगरे यांनी दाखल केली असून पुढील तपास बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिट्टमल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक समाधान कवडे करत आहेत.

# तहसीलदार शेळकेंच्या ठाम भूमिकेमुळे चार वर्षांपासून अडलेला सुलतानपूर- माळेवाडी रस्ता अखेर मोकळा

**• तीन किलोमीटरचा रस्ता खुला झाल्याने शेतकरी समाधानी**

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील सुलतानपूर ते माळेवाडी हा सार्वजनिक रस्ता चार वर्षांपासून अतिक्रमण आणि वादात अडकून पडला होता . या रस्त्यामुळे गावातील जनतेचे रोजचे जगणे अवघड झाले होते . शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी लांबचा फेरा मारावा लागत होता . आजारी माणसांना दवाखान्याचा रस्ता बंद झाला होता . विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचताना रोज अडचणी येत होत्या . गावकरी वैतागले होते , पण प्रश्न काही सुटत नव्हता .



या रस्त्याबाबत मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम ५ अन्वये रस्ता खुला करण्याचे आदेश याआधीच झाले होते . मात्र काही लोकांनी अडथळे घातल्याने प्रत्यक्षात रस्ता खुलाच होत नव्हता . अखेर बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत स्वतः जागेवर जाऊन पाहणी केली आणि अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट आदेश दिले . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सार्वजनिक रस्ते आणि शासकीय मालमत्ता याबाबत कोणतीही तडजोड नको , असे स्पष्ट आदेश दिले आहेत . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी करताना कुणालाही पाठीशी घालू नये , अशी ठाम भूमिका घेतली आहे . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्याकडून नियमित आढावा घेण्यात येतो . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकाऱ्यांना तातडीने कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले होते . बीड उपविभागाच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सार्वजनिक रस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल , असा इशारा दिला आहे . कारवाईदरम्यान महसूल , पोलीस आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

# निवडणुका कधीही होऊ द्या; मी जनतेच्या सेवेत सदैव तत्पर: राजेंद्र मस्के

**विकास आणि जनविश्वासाच्या बळावर मला विजयाची खात्री..!**

**बीड । प्रतिनिधी**

आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील मौजे करचुंडी येथील शिंदे वस्तीला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी आपल्या सेवाभावी कार्याचा आढावा घेत जनतेचा विश्वास असल्याने आगामी निवडणुका कधीही झाल्या तरी विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला. मी सदैव जनतेच्या थेट संपर्कात आहे. एक फोन आला तरी मी तत्काळ प्रतिसाद देतो आणि अडचणी ▶▶ उर्वरित पान २ वर



# चाकरवाडी जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व युवा दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

माझी शाळा माझा अभिमान या ध्येयवाक्यानुसार गुणवत्तेसोबतच सहशालेय उपक्रमांना महत्त्व देत बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चाकरवाडी येथे दि. १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती (युवा दिन) अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली. यावेळी विद्यार्थीनी राष्ट्रमाता जिजाऊंच्या वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांनी लेझीम, तर काही विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते सादर करून त्यांच्या विचारांचे महत्त्व उलगडून सांगितले. या कार्यक्रमास गावातील महिला पालक, प्रतिनिधी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे तसेच शाळेच्या उपक्रमशीलतेचे मनापासून कौतुक केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

# आधुनिक आंबेडकरी युवकांनी नीतिमत्तेला जीवनमूल्य बनवावे : धम्मचारी ज्ञानसंभव यांचे प्रतिपादन

**माजलगाव । प्रतिनिधी**

आधुनिक युगात तंत्रज्ञान, स्पर्धा व भौतिक आकर्षणांच्या गर्दीतून वाट काढताना आंबेडकरी युवकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित नीतिमत्तेला आपल्या जीवनाचे केंद्रबिंदू बनवावे, असे स्पष्ट मत धम्मचारी ज्ञानसंभव यांनी व्यक्त केले. त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगाव यांच्या वतीने आयोजित एकदिवसीय युवक कार्यशाळेत ते बोलत होते.




फ्लाईंग बर्डस् अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज, माजलगाव येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत रोल प्ले, विचारमंथन, चर्चासत्र आदी उपक्रमांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आधुनिक जगासाठीचे विचार प्रभावीपणे मांडण्यात आले. कार्यशाळेसाठी धम्मचारी ज्ञानसंभव व धम्मचारी सामसिद्धी यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. या उपक्रमास ७५ युवक-युवतींसह १५ ▶▶ उर्वरित पान २ वर

# लग्नाला सहा वर्षे, ३ गोड चिमुकल्या अनाथ, वंशाला दिवा पाहिजे म्हणून अरूणाचा होत होता छळ

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यात एक खळबळजनक घटनेणे जिल्ह्यात संतापाची लाट पसरली आहे. तुला सलग तीन मुलीच झाल्या आहेत, आमच्या वंशाला दिवा पाहिजे, असे म्हणत सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या सततच्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून अरुणा उद्धव ठोंबरे (वय २५) या तरुण विवाहितेने अखेर टोकाचे पाऊल उचलले. आपल्या तीन चिमुरड्या केलीना वाऱ्यावर सोडत केज तालुक्यातील उंदरी येथे अरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवन संपवली.घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, लातूर जिल्ह्यातील आजरखेडा (ता. रेणापूर) येथील प्रकाश सूर्यवंशी यांची मुलगी अरुणाचा विवाह १६ ऑगस्ट २०१९ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथील उद्धव ठोंबरे याच्याशी झाला होता. अरुणाने देखील आपल्या संसाराची स्वप्ने पाहिली होती, अतिशय मनमिळाऊ असलेल्या अरुणाला एक पाठोपाठ तीन मुली झाल्या. यामध्ये राजनंदिनी, तर दोघी जुळ्या आर्या आणि अपूर्वा अशा तीन चिमुकल्या मुली आहेत. या तिन्ही मुली झाल्याने अरुणा आनंदी होती. मात्र सासरचे मंडळींनी मुली झाल्याचा आनंद मानण्या ऐवजी अरुणाला याच कारणावरून हिणवण्यास सुरुवात केली, असे फिर्यादीत सांगण्यात आले आहे. याच ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडला महसूल अधिकाऱ्याचा जमीन मोजणीत खोडा त्रासाला कंटाळून थेट तहसील कार्यालयात एकाच कुटुंबातील चौघांचा डिझेल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तहसील कार्यालयात एका कुटुंबाने महसूल अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळीच पोलीस प्रशासनाने प्रतिबंध केल्याने मोठा अनर्थ टळला.केज न्यायालयाच्या आदेशानुसार जमिनीची मोजणी करून सीमांकन दाखविण्याचे तहसीलदारांचे आदेश असतानाही मंडळ अधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणी कर्मचाऱ्याला सहकार्य न केल्याने लांडगे कुटुंबातील चौघांनी काल केज तहसील कार्यालयाच्या दारातच अंगावर डिझेल ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. केज-बीड राष्ट्रीय महामार्गालगतच्या गायरान जमिनीतील वडिलोपार्जित जमीन लांडगे कुटुंबाकडे वहिवाट आहे. त्यांना या जमिनीचा ताबा मिळालेला नाही. जमिनीची मोजणी करून सीमांकन करून देण्यासाठी तहसीलदारांनी ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व भूमी अभिलेख कार्यालयाचे मोजणी ▶▶ उर्वरित पान २ वर



# बबनराव काशीद यांचे दु:खद निधन



**बीड । प्रतिनिधी**

१२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी दै. रिपोर्टरचे जाहिरात व्यवस्थापक राजेंद्र काशिद यांचे वडील बबनराव काशिद (वय ९६ वर्ष ) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम, मोंढा रोड येथे दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. बबनराव काशिद यांच्या पश्चात भाऊ, बहिण, मुले, मुलगी, जावाई, नातवंडे, पतरुंडे असा मोठा परिवार आहे. काशिद परिवाराच्या दु:खात दैनिक मराठवाड पत्र परिवार सहभागी आहे.

# जय हनुमान केसरी 2026 बैलगाडा शर्यतीचे शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या हस्ते भव्य उद्घाटन



**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर सर्कल मधील मौजे केसापुरी (प.) येथील गाडीऊतार तांडा, पाटखिळा मैदान येथे संक्रांतीनिमित्त आयोजित जय हनुमान केसरी २०२६ बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. युवानेते निवृत्ती नाना शिंदे, स्वप्निलजी नरवडे, रमेशजी कवचट व दशरथजी राऊत यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी परमेश्वर सातपुते सर यांनी बैलगाडा शर्यतीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रथम क्रमांकाच्या विजेत्यासाठी स्कुटी बक्षीस म्हणून आयोजकांकडे सुपूर्द केली. तसेच आयोजक मंडळ व सर्व बैलगाडा मालकांना मनःपूर्वक शुभेच्छा देत ग्रामीण खेळ व परंपरा जपण्याचे आवाहन केले. या शर्यतीमध्ये बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील विविध तालुक्यांमधून आलेल्या नामांकित बैलजोड्यांनी सहभाग घेतला होता.

बैलगाडा शर्यत ही ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग असून शेतकऱ्यांच्या कष्टाचे व पशुधनावरील प्रेमाचे प्रतीक मानली जाते. शेतकऱ्यासाठी बैल हा केवळ जनावर नसून तो कुटुंबातील एक सदस्य असतो. वर्षभर शेतीकामात साथ देणाऱ्या बैलांची ताकद, वेग व शिस्त या शर्यतीतून प्रकट होते. त्यामुळे या स्पर्धा केवळ मनोरंजनापुरत्या मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या श्रमाचा आणि आत्मसन्मानाचा गौरव ठरतात.

या उपक्रमामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते. बैलांची खरेदी-विक्री, चारा, औषधोपचार, सजावट, वाहतूक तसेच स्थानिक व्यावसायिकांना मिळणारा रोजगार यामुळे अनेक कुटुंबांचे उत्पन्न वाढते. तसेच तरुण पिढी ग्रामीण परंपरेशी जोडली जाते. या कार्यक्रमास युवा नेते अरुणभाऊ बोंगाणे, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख दादासाहेबजी सोनवणे, युवा नेते अश्विनजी लांडे पाटील, शामजी काकडे, सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेरचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, बिभीषणजी डोईफोडे, धनंजयजी कदम, बबनभाऊ मुंडे तसेच गावातील व जिल्हाभरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.